दिनविशेष

◆२००१ : प्रसिद्ध लेखक व नाटककार विजय तेंडुलकर यांची 'कथा चुडामणी' पुरस्कारासाठी निवड.
◆२०१५ : जमैकाच्या शेली ॲन फ्रेझर प्रिसेने महिलांची शंभर मीटर शर्यत जिंकून जागतिक अजिंक्यपद मैदानी स्पर्धेत सलग तिसरे सुवर्णपदक मिळविले.
◆२०१६ : महाराष्ट्रात लोकप्रिय असलेल्या दहीहंडी उत्सवात दहीहंडीचा थर वीस फुटांच्या वर नेण्यात येऊ नये हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केला.

दिनमान

प्रा. रमणलाल शहा

मेष : गुरुकृपा लाभेल. मानसिक स्वास्थ्य व समाधान लाभेल.
वृषभ : महत्त्वाची कामे शक्यतो पुढे ढकलावीत. वादविवाद टाळावेत.
मिथुन : जोडीदाराचा सल्ला लाभदायक ठरेल. नवी दिशा व नवा मार्ग सापडेल.
कर्क : काहींना आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. कर्मचारीवर्गाचे सहकार्य लाभेल.
सिंह : मुलामुलींचे प्रश्न मार्गी लावू शकाल. तुमचे निर्णय व अंदाज अचूक ठरतील.
कन्या : प्रॉपर्टी व गुंतवणुकीची कामे मार्गी लागतील. काहींना कामानिमित्त प्रवास होतील.
तूळ : एखादी महत्त्वाची जबाबदारी येऊन पडेल. नोकरीत समाधानकारक स्थिती राहील.
वृश्चिक : जुनी येणी वसूल होतील. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.
धनू : रखडलेली कामे मार्गी लागतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल.
मकर : काहींचा आध्यात्माकडे कल राहील. प्रवास टाळावेत.
कुंभ : प्रियजनांचा सहवास लाभेल. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंवाद साधाल.
मीन : तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल.

शब्दशोध क्र. १९९

प्र. के. कुलकर्णी

१	२		३	■	४	■	५
६		■	७	८		९	
	■	१०			■	११	
■	१२		■	■	१३		■
१४	■	१५	१६			■	१७
१८		■		■	१९	२०	
	■	२१		■	२२		
२३				■	२४		

आडवे शब्द : १) उच्च प्रतीचा एक तांदूळ ६) डोंगरी किल्ला ७) प्रारब्ध; दैव; प्राक्तन १०) सिंह वगैरे प्राण्याच्या मानेवरचे केस ११) आतापर्यंतच्या आयुष्याचे मोजमाप; इंग्रजीत एज १२) वर्तमान दिवस; चालू दिवस १३) मृत पतीच्या शरीराबरोबर स्वतःचे दहन करून घेणारी; पतिव्रता; पार्वती १५) दुर्लौकिक प्राप्त झालेला; नाव खराब झालेला १८) चार वार्णांपैकी एक १९) सत्त्वयुक्त; कसदार २१) मित्र; सोबती; यार २२) स्वामी; पती; धनी २३) परवानगीचे पत्र; परमिट २४) कालवा; पाट

उभे शब्द : १) सुबत्ता; समृद्धी; सुकाळ २) झाडावर पिकलेले फळ ३) अगदी सहज; हसतखेळत ४) मार्ग; पथ; रस्ता ५) भगव्या रंगाचा ८) तोंडात तयार होणारा चिकट रस; मुखरस ९) सत्तावीस नक्षत्रांपैकी एक १०) आश्चर्यकारक १३) अगदी सारखे; तुल्य १४) वरून खाली थेंब थेंब पाणी पडण्याचा आवाज १६) रुग्णालय; हॉस्पिटल १७) वेशीवरचा पहारेकरी २०) भांडण; तंटा; वाद; बखेडा २१) एक अधिक पाव

शब्दशोध १९८ चे उत्तर

प	व	न	सु	त	■	का	पा
रा	न	■	वा	स	र	म	णी
■	■	क	स	र	त	■	दा
सं	क	ष्ट	■	■	न	ग	र
प	र	■	द	र	बा	र	■
■	न	ज	र	■	व	ज	न
धा	क	■	म	ग	■	वं	ग
वा	र	■	हा	त	■	त	री

सकाळ कनेक्ट

SIILC Transforming Human Capital

आयुर्वेदिक अभ्यंग मसाज कार्यशाळा

पुणे, ता. २३ : मसाज अथवा आयुर्वेदिक अभ्यंग केल्याने आरोग्यासंबंधी तक्रारी दूर होतात व वात-पित्त-कफाचे संतुलन राखले जाते. आरोग्याच्या जागृतीमुळे गेल्या काही वर्षांत सतत वाढत असणाऱ्या या क्षेत्रात तज्ज्ञ व्यावसायिकांची मागणी आहे. याबाबत मार्गदर्शन करणारी तीन दिवसीय कार्यशाळा ३, ४ आणि ५ सप्टेंबरला आयोजित केली आहे. कार्यशाळेत अभ्यंग मर्दन संकल्पना, मसाजचे तंत्र, मंत्र व शास्त्र, फायदे, वात-पित्त-कफ प्रकृतीनुसार मसाज, औषधी तेले, शिरोभ्यंग, पादाभ्यंग, स्ट्रोक्स, स्नेहन, स्वेदन, पावडर मसाज, उदवर्तन, मसाज कधी व किती वेळ करावा, कधी करू नये याबाबत प्रात्यक्षिकासहित मार्गदर्शन होणार आहे.
संपर्क : ८४८४८११५४४

रिअल इस्टेट व्हॅल्युएशन, गुंतवणूक कार्यशाळा

मालमत्तेचे अचूक मूल्यांकन आणि फायदेशीर गुंतवणुकीचे निर्णय घेण्यासाठी 'रिअल इस्टेट व्हॅल्युएशन व गुंतवणूक विश्लेषण' या विषयावरील विशेष प्रात्यक्षिक कार्यशाळा १३ सप्टेंबरला आयोजिली आहे. रिअल इस्टेट सल्लागार, प्रॉपर्टी कन्सल्टंट, गुंतवणूकदार, आर्किटेक्ट, सिव्हिल इंजिनिअर्स, बिल्डर्स तसेच बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे. कार्यशाळेत रिअल इस्टेट बाजारातील कल, मालमत्ता मूल्यांकनाच्या आधुनिक पद्धती, परिसर विश्लेषण, भाडे उत्पन्न, गुंतवणुकीवरील परतावा, गुंतवणूक विश्लेषण, महारेरा नियम, जोखीम मूल्यांकन आणि विकासक्षम भागांची ओळख याविषयी मार्गदर्शन केले जाईल. प्रत्यक्ष उदाहरणे, केस स्टडीज, लाइव्ह मार्केट ॲनालिसिस आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे सहभागी अधिक आत्मविश्वासाने व फायदेशीर रिअल इस्टेट गुंतवणूक निर्णय घेऊ शकतील.
संपर्क : ८४८४८२२८५५

आयात-निर्यात व्यवसाय प्रशिक्षण

जागतिकीकरणामुळे भारतीय उत्पादने जगभरातील बाजारपेठेत पोहोचविण्याच्या संधी वाढल्या असून, योग्य नियोजन आणि व्यावसायिक धोरणांच्या आधारे आयात-निर्यात व्यवसाय सुरू करता येतो. या पार्श्वभूमीवर सात दिवसांचे 'आयात-निर्यात व्यवसाय संधी व व्यवस्थापन' प्रशिक्षण सुरू होणार आहे. यात एक्झिम धोरण, नोंदणी व परवाने, इन्कोटर्म्स, शिपिंग व कंटेनर व्यवस्थापन, आंतरराष्ट्रीय मालवाहतूक, दररचना, पॅकेजिंग, लेबलिंग, डिजिटल टूल्स आणि शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच परदेशी ग्राहक व पुरवठादार शोधणे, बाजारपेठेचा अभ्यास, उत्पादनाची निवड, आंतरराष्ट्रीय वाटाघाटी, व्यवहारातील जोखीम व्यवस्थापन, कागदपत्रे, पेमेंट पद्धती, बँकिंग, कस्टम्स व शिपिंग प्रक्रिया यांची माहिती दिली जाईल. प्रत्यक्ष उदाहरणे व केस स्टडीजच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना व्यवसायाची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली जाणार असून स्टार्टअप्स, लघुउद्योजक, व्यापारी, उत्पादक आणि नवउद्योजकांसाठी हे प्रशिक्षण विशेष उपयुक्त ठरणार आहे.
संपर्क : ८४८४८११५४४

एसआयआयएलसीच्या विविध कार्यशाळांची माहिती मिळवण्यासाठी व नावनोंदणीसाठी क्यूआर कोड स्कॅन करावा.

राहुल गांधी आणि 'सीजेपी'चे सरकारपुढे आव्हान

राजधानी दिल्ली



सुनील चावके
'सकाळ'च्या नवी दिल्ली ब्यूरोचे प्रमुख

मोदी सरकारपुढे सध्या दोन मुख्य राजकीय आव्हाने उभी ठाकली आहेत. त्यांना यशस्वीरीत्या सामोरे जायचे असेल तर ठोस कृतिशील पावले टाकून प्रश्नांचे निराकरण करणे हाच मार्ग आहे. तसे झाले तरच राहुल गांधी आणि 'कॉक्रोच जनता पार्टी'चा 'जेन-झी', 'जेन अल्फा'वरील प्रभाव ओसरायला लागेल. ते कितपत शक्य आहे, यावर देशाच्या राजकारणाची दिशा ठरेल.

पेपरफुटी आणि परीक्षा गैरव्यवहारावरून रस्त्यांवर उतरलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला तार्किक शेवटाकडे नेण्याच्या प्रयत्नांत राहुल गांधी यांनी बरोबर एका महिन्याच्या अंतराने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची राजधानी दिल्लीत अनपेक्षितपणे कोंडी केली. संसदेवरील 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या आवाहनावरून निघालेल्या विद्यार्थ्यांच्या २० जुलैच्या मोर्चावर दिल्ली पोलिस धोकादायक शस्त्रांनिशी तुटून पडल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे २१ जुलै रोजी राहुल गांधी यांनी गनिमी काव्याचा अवलंब करीत पंतप्रधान मोदी यांच्या निवासस्थानापुढे अचानक धडक देऊन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसह पेपरफुटी आणि पोलिसांच्या कारवाईचा निषेध केला.

महिन्याभरानंतर २१ ऑगस्ट रोजी त्यांनी अशाच गनिमी तंत्राने संसद मार्ग पोलीस ठाण्यात आंदोलकांविरुद्ध धोकादायक 'पॅलेट गन'चा वापर केल्याबद्दल गृहमंत्री अमित शहा यांना लक्ष्यच केले नाही, तर सहा तास धरणे देऊन त्यांच्या पोलिसांना त्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले. २१ जुलै ते २१ ऑगस्ट या महिन्याभराच्या काळात मोदी सरकारपाशी ३६९ खासदारांचे समर्थन असल्याचा दावा केला जातो. त्या लोकसभेत आणि सुरक्षा दल केंद्र सरकारविरुद्ध चिटपाखरूही फिरकू देत नाही, अशा संसदेबाहेर ल्युटन्स दिल्लीच्या रस्त्यांवर राहुल गांधी यांच्या धक्कातंत्राने मोदी सरकारची यंत्रणा पार खिळखिळी झाली आहे. जंतरमंतरवरील 'कॉक्रोच जनता पार्टी'चे आंदोलन जिथे संपले, तिथून पुढे राहुल गांधी यांनी आंदोलनाची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि मोदी सरकारवरील दबाव सतत कायम ठेवला.

राहुल गांधींची स्ट्रॅटेजी

पाच वर्षांपूर्वी 'पप्पू' म्हणून हिणवलेल्या राहुल गांधी केवळ पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहाच नव्हे तर अवघ्या भाजप आणि संघाच्या विरोधात उभे ठाकले आहेत. विरोधकांच्या एकाही मागणीवर अजिबात न बधणाऱ्या मोदी सरकारला नकारात्मक प्रसिद्धी मिळत असल्यामुळे सतत बचावात्मक पवित्रा घ्यावा लागत आहे. राहुल गांधी यांना मोदी सरकारवर दडपण आणणे शक्य झाले ते दोन गोष्टींमुळे. एक तर ते लोकसभेतील विरोधी पक्षनेते असल्यामुळे एका मर्यादेपलीकडे त्यांना सर्वसामान्य खासदारांसारखी वागणूक देणे सरकारला शक्य होत नाही. दुसरे म्हणजे मोदी सरकारला पेचात पाडण्यासाठी आखलेली कोणतीही मोहीम शेवटच्या क्षणापर्यंत या कानाची माहिती त्या कानाला कळू न देता गुप्तपणे राबविण्याचे राहुल गांधींचे तंत्र कमालीचे यशस्वी ठरले आहे. यापूर्वी मोदी सरकारवर चाल करून जाण्यासाठी राहुल गांधी आधीच घोषणा करायचे. त्यामुळे सावध झालेल्या सरकारी यंत्रणेला त्यांना रोखणे आणि निष्प्रभ करणे सहज शक्य होत होते. काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांना विश्वासात घेऊन एखादे आंदोलन छेडण्याची योजना आखली तरी ती जाहीर होण्यापूर्वीच सरकारच्या कानावर पडत होती. राहुल गांधी आपल्याला हव्या त्या पद्धतीने राजकारण करीत नाहीत आणि महत्त्वही देत नाही, याचे दुःख बाळगणारे काँग्रेसमधील 'झारीतील शुक्राचार्य' वचपा काढण्याची कोणतीही संधी सोडत नव्हते. त्यामुळे राहुल गांधींच्या अनेक आक्रमक चाली यापूर्वी फोल ठरत होत्या. पण जेव्हापासून त्यांनी आपल्या राजकारणात गोपनीयतेचा आणि धूर्ततेचा वापर सुरु केला तेव्हापासून सर्वसामान्यांमध्ये त्यांच्या धक्कातंत्राची परिणामकारकता वाढून मोदी सरकार त्रस्त झाले आहे.

हवा निर्माण झाली

राहुल गांधींची पुढची चाल काय असेल हे आजवर ओळखणे सोपे होते. आता ते अचानक अवघड झाले आहे. केंद्रात मनमोहन सिंग यांचे सरकार असताना काँग्रेसमधील बेदिली आणि बेबनावाचा फायदा उठवून अण्णा हजारे, बाबा रामदेव आणि 'निर्भया' आंदोलनांनी अशी काही पायाभरणी केली होती की त्यावर नरेंद्र मोदी यांना सत्तेची इमारत उभारणे सहज शक्य झाले. आज संघ-भाजपमध्ये बेदिली नसली तरी राहुल गांधी यांच्या आक्रमकतेला सामोरे जाताना पूर्वीसारखा एकजिनसीपणा राहिलेला नाही. गेली बारा वर्षे धक्कातंत्राला भय-दहशतीची जोड देत मोदी सरकारने विरोधी पक्षांना सतत दबावाखाली ठेवले. राहुल गांधींचा अपवाद वगळता काँग्रेससह सर्व विरोधी पक्ष गृह मंत्रालयाच्या तसेच ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभागाच्या दबावातून अजूनही मुक्त झालेले नाही. 'जंतरमंतर'वरील विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि राहुल गांधी यांच्या अपारंपरिक पद्धतीच्या (भाजप नेत्यांच्या भाषेत अराजक माजविणाऱ्या) राजकारणामुळे एक हवा निर्माण झाली आहे, हे नक्की.

अशा परिस्थितीला कधी सामोरे जावे लागेल, याची मोदी सरकार आणि त्यांच्या समर्थकांनी कधी कल्पना केली नसेल. अण्णा हजारेंचे आंदोलन सुरु असताना भाजपने समांतरपणे जेवढा राजकीय लाभ पदरी पाडून घेतला नसेल, तेवढा राहुल गांधी यांनी 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या आंदोलनापासून फायदा करून घेतला आहे. सहा जूनपासून चर्चेत असलेल्या 'जंतरमंतर'वर एकदाही पाय न ठेवता राहुल गांधी त्या आंदोलनाच्या लाटेवर स्वार झाले आहेत.



नरेंद्र मोदी



राहुल गांधी



अभिजित दीपके

'जंतरमंतर'वरील पोलिसी अत्याचारांविरुद्ध 'सीजेपी'च्या नेत्यांपेक्षा अधिक आक्रमकतेने आवाज उठवत आहेत. राहुल गांधींची पुढची चाल काय असेल, हे जाणून घेण्यासाठी काँग्रेस नेत्यांवर विसंबून असलेल्या सरकारला आपल्या गुप्तचर यंत्रणेचा आजवर फारसा वापर करून घेण्याची गरजच पडली नाही. त्यामुळे आता राहुल गांधी यांच्या प्रत्येक हालचालीवर पाळत ठेवणे सरकारला क्रमप्राप्त ठरणार आहे. अवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीत देशाच्या राजकारणाचे चित्र बदलणाऱ्या नाट्यमय घटनाक्रमामुळे केंद्रात सत्तेत असलेले कोणतेही हादरून गेले असते. पण पंतप्रधान मोदी यांनी हार मानलेली नाही. जेन-झीने निर्माण केलेल्या आव्हानांना पूर्ण ताकदीने सामोरे जाण्याचा निर्धार करून पंतप्रधान मोदी आणि त्यांचे सहकारी मैदानात उतरले आहेत. राहुल गांधींच्या आक्रमक डावपेचांना वेसण घालून निष्प्रभ करणे, अभिजित दीपकेंच्या 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या भविष्यातील आंदोलनांना सामोरे जाताना 'जंतरमंतर'वर केलेल्या चुकांची पुनरावृत्ती टाळणे आणि आपल्या पालकांच्याही काबूत नसलेल्या 'जेन-झी', 'जेन अल्फा'च्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सरकार आणि प्रशासनाच्या विचारसरणीत तसेच कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची आव्हाने पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांपुढे आहेत. त्यासाठी गेल्या बारा वर्षांपासून वापरत असलेले तंत्र आणि डावपेच कुचकामी ठरल्याचे २० जुलैने दाखवून दिले आहे.

नवी पिढी 'इन्स्टाग्राम'वरील 'रिल्स'वर आणि मंत्र्यांनी दिलेल्या तोंडदेखल्या आश्वासनांवर भाळणारी नाही. वेळ न दवडता ठोस कृतीने प्रश्नांचे निराकरण केल्यानेच राहुल गांधी आणि 'कॉक्रोच जनता पार्टी'चा 'जेन-झी', 'जेन अल्फा'वरील प्रभाव ओसरायला लागेल. ते कितपत शक्य आहे, यावर देशाच्या राजकारणाची दिशा ठरणार आहे.

सकाळ प्रीमियर

भोंदूगिरीच्या मुखवट्यामागचं सत्य उलगडणार



भोंदूगिरी, अंधश्रद्धा आणि त्यामागे दडलेले सामाजिक वास्तव यावर भाष्य करणाऱ्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या आगामी मराठी चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आहे. दिग्दर्शक स्वरूप सावंत यांच्या या चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच त्याच्या विषयाची चर्चा सुरू होती.अभिनेत्री दीपाली सय्यद यांच्या व्यक्तिरेखेची झलक समोर आल्यानंतर आता टीझरमधून चित्रपटाच्या कथानकाची काहीशी झलक पाहायला मिळते. टीझरची सुरुवात एका आलिशान बंगल्याबाहेर येऊन थांबणाऱ्या पांढऱ्या कारपासून होते. पैशांची बॅग, रक्ताभिषेकासारखा प्रकार आणि त्यानंतर थेट पोलिस ठाण्यात पोहोचणारी कथा, चित्रपटात भोंदूगिरीच्या माध्यमातून घडणाऱ्या घटनांचा तपास घेतला जाणार असल्याचे सूचित करते. अभिनेता अक्षय टंकसाळेचीही झलक पाहायला मिळते. 'आता सगळं उघड होणार...!' ही चित्रपटाची टॅगलाइन असून, टीझरमधील घटनांमुळे चित्रपटात नेमके कोणते खुलासे केले जाणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. आनंदी पिक्चर्स अमरावती आणि सचिन रोडे पाटील प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती फ्लेमिंगो क्रिएशन आणि मातोश्री एन्टरटेन्मेंटच्या बॅनरखाली करण्यात आली आहे. देवेंद्र भट, सूर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे निर्माते आहेत. चित्रपटात दीपाली यांच्यासोबत उदय टिकेकर आणि अक्षय टंकसाळे महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. देवेंद्र भट, सूर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे या चित्रपटाचे निर्माते आहेत.

धर्मेंद्र यांच्या आठवणींत रमले राजकुमार संतोषी

'घायल', 'दामिनी', 'अंदाज अपना अपना' आणि 'द लिजेंड ऑफ भगतसिंग' यांसारखे गाजलेले चित्रपट देणारे दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांनी सामाजिक प्रश्न, न्याय आणि देशभक्तीला आपल्या चित्रपटांतून भिडवणाऱ्या कलाकृतींनी प्रेक्षकांच्या मनात वेगळी जागा निर्माण केली आहे. याच पार्श्वभूमीवर संतोषी यांनी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या धर्मेंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष संगीतमय कार्यक्रमाला उपस्थिती लावली. वांद्रे पश्चिम येथील सेंट अँड्रयूज सभागृहात 'प्यार ही प्यार बेशुमार' या कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. धर्मेंद्र यांच्या प्रदीर्घ चित्रपटप्रवासातील गाणी, आठवणी आणि त्यांच्या अभिनयाची मोहिनीझ या निमित्ताने पुन्हा अनुभवायला मिळाली. बिगटाइम एंटरटेन्मेंटचे संस्थापक पंकज रैना यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



मधुबाला साकारण्यासाठी साराची जय्यत तयारी

हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री मधुबाला यांच्या जीवनावर आधारित आगामी बायोपिकच्या कामाला आता वेग येण्याची शक्यता आहे. संजय लीला भन्साळी यांच्या निर्मितीत आणि जस्मीत के. रीन यांच्या दिग्दर्शनाखाली साकारल्या जाणाऱ्या या चित्रपटात सारा अर्जुन मधुबालाची भूमिका साकारणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. सध्या भन्साळी 'लव्ह अँड वॉर'च्या चित्रीकरणात व्यस्त असून रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल यांच्या या चित्रपटाचे अंतिम वेळापत्रक ऑगस्टअखेर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. गोरेगाव येथील रॉयल पाम्समध्ये चित्रपटातील शेवटच्या गाण्याचे चित्रीकरण होणार असून, त्यानंतर याच ठिकाणी 'मधुबाला' बायोपिकसाठी सेटमध्ये बदल करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, मधुबालाची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी सारा अर्जुनने तयारी सुरू केली आहे. मधुबालाचे व्यक्तिमत्त्व, त्यांची देहबोली, हावभाव आणि त्या काळातील त्यांचे जग समजून घेण्यावर तिचा भर असल्याचे सांगितले जात आहे. 'धुरंधर'मधील भूमिकेमुळे अलीकडे चर्चेत आलेल्या सारासाठी मधुबालाची भूमिका ही कारकिर्दीतील वेगळे आव्हान ठरणार आहे.



मराठी लघुपटाचा बंगळूरमध्ये गौरव

मराठी लघुपटांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी संधी निर्माण करणारा 'झाडावर कोरलेली गोष्ट' या चित्रपटाने १६व्या बंगळूर आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवात भारतीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. साईनाथ गणुवाड लिखित-दिग्दर्शित आणि मयूर देशमुख निर्मित या लघुपटाला बंगळूर येथे झालेल्या महोत्सवात हा गौरव मिळाला आहे. या पुरस्कारामुळे लघुपटाला ऑस्करच्या सर्वोत्कृष्ट लाइव्ह-ॲक्शन शॉर्ट फिल्मच्या पात्रता प्रक्रियेत पुढे जाण्याची संधी मिळाली आहे. अकादमी पुरस्कारांसाठी पात्रता देणाऱ्या भारतातील लघुपट महोत्सवांपैकी बंगळूर आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव हे महत्त्वाचे व्यासपीठ मानले जाते. यंदाच्या महोत्सवासाठी जगभरातील १०० हून अधिक देशांतून ३,३४० प्रवेशिका आल्या होत्या. त्यापैकी ७५६ चित्रपट भारतीय स्पर्धेसाठी निवडले गेले. अशा मोठ्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याने 'झाडावर कोरलेली गोष्ट'च्या महोत्सव प्रवासात महत्त्वाची भर पडली आहे. खेड शिवापूरच्या ग्रामीण परिसरात घडणारी २३ मिनिटांची ही कथा सातवीत शिकणाऱ्या निशा साळवे या मुलीभोवती फिरते. "हा पुरस्कार माझ्यासाठी आणि संपूर्ण टीमसाठी अत्यंत विशेष आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील माणसं, त्यांचा संघर्ष या चित्रपटाच्या मुळाशी आहेत. एका छोट्या गावातून आलेली मराठी कथा ऑस्करसाठी पात्रता देणाऱ्या महोत्सवात गौरवली जाणे हा मोठा सन्मान आहे," असे दिग्दर्शक साईनाथ गणुवाड यांनी सांगितले.



महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्या. (मफुमाविम) हे कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणाऱ्या एनएसडीसी, एसएससी, भारत सरकार (जीओआय)/महाराष्ट्र शासन (जीओएम) विभाग, जीओआय/जीओएम उपक्रम, जीओआय/जीओएम कंपन्या यांच्या पॅनेलसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (ईओआय) आमंत्रित करत आहेत.

पात्रता निकष, कामाची व्याप्ती, अटी व शर्ती, पॅनेलवर समाविष्ट होण्याची प्रक्रिया आणि इतर संबंधित तपशिलांसह असलेला सविस्तर ईओआय दस्तऐवज, महाराष्ट्र शासनाच्या **ई-टेंडरिंग पोर्टल https://mahatenders.gov.in** वरून डाउनलोड करता येईल.

प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ: ०१/०९/२०२६ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत

सही/-
महाव्यवस्थापक, मफुमाविम मर्या.

महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२८ क्वीन्स गार्डन, पुणे ४११००१

JEE (Mains & Advanced) and NEET प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षण तयारीसाठी अनिवासी प्रशिक्षण (ऑफलाईन) देण्याकरिता अनुसूचित जमातीच्या ५०० उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याबाबत

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे कार्यालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना इ. १२ वी नंतर ११ महिन्यांच्या कालावधीकरिता 'परीक्षेची पूनर्तयारी (Repeater)' करणारे ५०० उमेदवारांना ऑफलाईन स्वरूपात JEE (Mains & Advanced) and NEET प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षण (अनिवासी) देणे योजनेसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरूपात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर योजनेचा सविस्तर तपशील, शासन निर्णय आवश्यक कागदपत्रे इ.बाबतच्या अधिक माहितीकरिता या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ **https://trti.maharashtra.gov.in** ला भेट देऊन या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंकवरूनच ऑनलाईन स्वरूपातच अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी निर्धारित केलेल्या लक्षांक पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले तर सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) द्वारे गुणांकन पद्धतीने उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल आणि निर्धारित केलेल्या लक्षांक पेक्षा कमी अर्ज प्राप्त झाले तर उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतानुसार उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल. अनुसूचित जमातीतील उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व CET मधील प्राप्त गुणानुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील.

- **अर्ज करण्याचा सुरू दिनांक : २४-०८-२०२६**
- **अर्ज करण्याचा अंतिम दिनांक : ०८-०९-२०२६**

(निलेश सागर, भा.प्र.से)
आयुक्त

फॉर्म जी
रांकिनी पॉवर जनरेशन प्रायव्हेट लिमिटेड - कोलकाता येथे पॉवर जनरेशन कार्यात कार्यरत यांच्याकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे आमंत्रण
(इन्सॉल्व्हेंसी अँन्ड बँकरप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता परिसमापन ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनिमयन ३६ए (१) अंतर्गत)

अ. क्र	संबंधित तपशील	
१	पॅन/सीआयएन/एलएलपी नं. सह कॉर्पोरेट ऋणकोंचे नाव :	**सीडी** - रांकिनी पॉवर जनरेशन प्रायव्हेट लिमिटेड **पॅन नं. :** AABCR1630B सीआयएन नं. : U40100WB 1995PTC070451
२	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता :	**नोंदणीकृत कार्यालय** - खोली क्र. ७०१, ७ वा मजला, सिडको ग्लोबल टॉवर, सीएन ८/२, सेंटर - ५, सॉल्ट लेक सिटी, कोलकाता - ७०० ०९१, पश्चिम बंगाल, भारत.
३	वेबसाइटची यूआरएल :	https://rankinipower.sumedhamanagement.com
४	महत्त्वाच्या स्थायी संपत्ती असलेल्या जागेचे ठिकाण व पत्ता : कॉर्पोरेट ऋणकोचा	अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड (एएमएनईपीएल) मध्ये हिस्सा जो नागपूर येथे २५.६ मेगावॅट डीजी सेटसह २४६ मेगावॅट पॉवर प्लान्ट आहे. तथापि, प्रारंभिक दिनांक/सीआयआरपी प्रारंभ अर्जदाखल दिनांकापश्चात, एएमएनईपीएलच्या भागधारकांमध्ये काही विरलीकरण आले आहे जे कायदेशीर पडताळणीअंतर्गत आहेत.
५	मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता :	एनए
६	गत वित्तीय वर्षातील मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण व मूल्य	एनए
७	कर्मचारी/कामगारांची संख्या :	कंपनीमध्ये केवळ १ कर्मचारी आहे.
८	दोन वर्षांच्या अंतिम उपलब्ध वित्तीय अहवालासमवेत (शेड्युलसह) पुढील तपशील, धनकोंची सूची, पुढील प्रक्रियेच्या निश्चितीकरिता संबंधित तारखा उपलब्ध असलेले ठिकाण :	कॉर्पोरेट ऋणकोंसंदर्भातील पुढील तपशील वा कोणतीही अतिरिक्त माहिती अंतरिम ठराव अधिकारी/ठराव अधिकाऱ्यांकडून दिलेला **ई-मेल ip.rankinipower@gmail.com** च्या माध्यमातून प्राप्त करता येऊ शकेल.
९	संहितेच्या अनुच्छेद २५ (२) (एच) अंतर्गत ठराव अर्जदारांकरिताच्या पात्रतेच्या उपलब्धतेचे यूआरएल वरील ठिकाण :	माहिती अंतरिम ठराव अधिकारी/ठराव अधिकाऱ्यांकडून दिलेला ई-मेल ip.rankinipower@gmail.com च्या माध्यमातून प्राप्त करता येऊ शकेल.
१०	स्वारस्याच्या अभिव्यतीच्या प्राप्तीची अंतिम तारीख :	०८.०९.२०२६
११	संबंधित ठराव अर्जदारांची तात्पुरती सूची जारी करण्याची तारीख :	१८.०९.२०२६
१२	तात्पुरत्या सूचीसंदर्भातील हरकती सादर करण्याची अंतिम तारीख :	२३.०९.२०२६
१३	प्रस्तावित ठराव अर्जदारांची अंतिम सूची जारी करण्याची तारीख :	०३.१०.२०२६
१४	प्रस्तावित ठराव अर्जदारांकरिताअ माहिती स्मरणपत्र, मूल्यांकन ज्ञापन तसेच ठराव आराखड्याकरिता विनंती जारी करण्याची तारीख :	०८.१०.२०२६ (पात्र पीआरएजकडून नॉन - डिस्क्लोजर ॲग्रीमेंटच्या प्राप्तीच्या अधीन).
१५	ठराव आराखडा सादर करण्याची अंतिम तारीख :	०७.११.२०२६
१६	स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करण्यासाठीचा प्रोसेस ई-मेल आयडी :	ईओआय सादर करण्यासाठीचा प्रोसेस ई-मेल आयडी : ip.rankinipower@gmail.com
१७	एमएसएमई म्हणून कॉर्पोरेट ऋणकोंच्या नोंदणीकरण स्थितीचा तपशील :	कॉर्पोरेट ऋणको हे सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालयाकडे नोंदणीकृत नाहीत.

पुढे, संबंधिततारखा व विस्तृत स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता कॉर्पोरेट ऋणकोंची वेबसाइट https://rankinipower.sumedhamanagement.com वर उपलब्ध स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे (ईओआय) प्रक्रिया दस्तावेज पाहा किंवा ip.rankinipower@gmail.com येथे ई-मेल पाठवा.

रांकिनी पॉवर जनरेशन प्रायव्हेट लिमिटेड करिता
बिजय मुरमुरिया
अंतरिम ठराव अधिकारी/मानित ठराव अधिकारी
रांकिनी पॉवरजनरेशन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणी
नोंदणीकरण क्र. : IBBI/IPA - 001/IP-N00007/2016-17/10026
एएफए वैधता दिनांक : ३१.१२.२०२६ पर्यंत
आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता : ६ए, गीतांजली अपार्टमेंट, ८बी मिडलटन स्ट्रीट, कोलकाता -७०० ०७१, पश्चिम बंगाल.
आयबीबीआयकडे नोंदणीकृत ई-मेल आयडी : bijay_murmuria@sumedhamanagement.com
प्रोसेससंबंधित ई-मेल पत्ता : ip.rankinipower@gmail.com **वेबसाइट :** https://rankinipower.sumedhamanagement.com

ठिकाण : कोलकाता
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२६